
# सर्वधर्म समभाव




◆ संकल्पना ◆
**अरविंद चावरिया** भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, बुलडाणा

## बुलडाणा जिल्हा पोलीस दल

# बुलडाणा जिल्हा पोलीस दल

# सर्वधर्म समभाव

◆ संकलपना ◆

**अरविंद चावरिया** भा.पो.से.

पोलीस अधीक्षक, बुलडाणा

◆ प्रकाशक ◆

**पोलीस अधीक्षक**
**बुलडाणा जिल्हा पोलीस दल**

◆ मुद्रण स्थळ ◆

मयुरेश क्रिएशन, शास्त्री मोहल्ला, जालना
Ph. 9822075026, 8007170808

◆ फक्त खाजगी वितरणासाठी ◆ जनहितार्थ विनामूल्य

**Declaration :** ही पुस्तिका केवळ एक संदर्भ पुस्तिका असून यातील मजकूर कोणत्याही न्यायालयात अथवा कार्यालयात जशाचा तसा ग्राह्य ठरणार नाही. त्याकरिता संबंधित कायद्याचे पुस्तकाचा / शासन निर्णयाचा संदर्भ घेण्यात यावा.

# भूमिका



**अरविंद चावरिया** भा.पो.से.
पोलिस अधीक्षक, बुलडाणा

बुलडाणा जिल्ह्याचा सांस्कृतिक आणि सामाजिक स्वभाव हा नेहमीच सर्वसमावेशक राहिला आहे. ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व असणारा हा जिल्हा आहे. या जिल्ह्याने ऐतिहासिक किंवा सामाजिक बदल असोत अथवा सांस्कृतिक किंवा शैक्षणिक बदल असोत, नेहमी समजदार भूमिका घेत सर्वांचे स्वागत करत आलेले आहे.

'शुभ्र तांदळात जसे खडे' तसे समाजकंटक जगात सर्वत्र असतात. आपल्या स्वार्थासाठी ते जाती धर्मात तेढ निर्माण करत वातावरण भडकवतात आणि स्वार्थ साधतात. अशा संघर्षाच्या, दंगलीच्या, बेकायदेशीर आणि समाजविघातक, विध्वंसक घटनांना या जिल्ह्याने थारा दिला नाही. गुण्या-गोविंदाने सर्व धर्म एकत्र नांदतात. हे या जिल्ह्याचे वैशिष्टे आहे. इथले समजदार नागरिक, दक्ष पोलिस, कर्तव्यतत्पर प्रशासन आणि बंधुतेचे व एकतेचे महत्त्व ओळखणारे प्रत्येक समाजाचे प्रतिनिधी यांनी नेहमीच याबाबतीत घडणाऱ्या घटना वेळीच रोखण्यात आपले योगदान दिले.

हा सगळा इतिहास झाला. वर्तमानाचा विचार करत भविष्याचा वेध घेताना जेव्हा आपण उद्याच्या पिढीचा विचार करतो तेव्हा धार्मिक तेढ

निर्माण करणाऱ्या घटना घडू नयेत, हा एकमेव विचार आणि इच्छा समोर येते.

यासाठी लोकप्रबोधन, जनजागृती आणि सकारात्मक वातावरण तयार होणे अत्यंत आवश्यक असल्याचे जाणवते. त्यादृष्टीने हे पुस्तक आम्ही प्रकाशित करत आहोत. ज्या धर्माच्या नावाने अशा अप्रिय घटना घडतात ते सगळे धर्म एकमेकांच्या विरुद्ध किंवा विपरीत नसून सर्वांची शिकवण समान आहे आणि सर्वजण एकमेकांना पूरक आहेत, हे समजून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही धर्मात अशा विघातक कृत्याचे कधीही कुठेही समर्थन केलेले नाही, हा मुद्दा सर्वात महत्वाचा आहे.

हे पुस्तक वाचून ती माहिती आणि ती जाणीव नक्की प्राप्त होईल. त्या दृष्टीने विचार केल्यास हा उद्देश पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. कोणत्याही धर्माविरुद्ध बोलताना आधी या पुस्तकातल्या मजकुराचा विचार केला तर असे बोलताना दहा वेळा विचार केल्याशिवाय राहणार नाही.

**जय हिंद!**

# प्रस्तावना

सध्या जाती धर्मादरम्यान अशांतता, तंटेबखेडे, द्वेषाच्या आणि संघर्षाच्या अनेक घटना सातत्याने समोर येत आहेत. सर्वधर्मसमभाव आणि सहिष्णुता यांचा संदेश देणाऱ्या आपल्या भारतीय संस्कृतीला हे शोभणारे नाही.

'मजहब नही सिखाता, आपसे मे बैर रखना' असे एक कवी म्हणतो ते अगदी खरे आणि यथार्थ आहे. कोणताही धर्म दुसऱ्या धर्माला कमी लेखत नाही, द्वेष करायला शिकवत नाही, शत्रुत्व शिकवत नाही, अन्याय अत्याचार करायला सांगत नाही, आपण श्रेष्ठ आणि अन्य कनिष्ठ असे कधीही सांगत नाही.

कोणत्याही धर्म संस्थापकाने, कोणत्याही धर्मग्रंथात अशी कोणतीही गोष्ट सांगितली नाही, ज्याने माणसामाणसात वैर होईल. सगळ्यांनी सगळ्या ठिकाणी सगळ्या काळात सत्य, सहिष्णुता, समानता, दया, क्षमा, शांती, एकता, बंधुता, सेवा आणि त्यागाची शिकवण दिली आहे.

याविरुद्ध जर कोणी काही सांगत असेल, माथी भडकावत असेल, चुकीच्या मार्गाला नेत असेल, तर सर्वांनी मिळून त्याचा विरोध करून त्याच्या विघातक योजना नेस्तनाबूत केल्या पाहिजेत.

समाजात, राज्यात आणि देशात शांतता आणि सलोखा कायम राखण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न केले पाहिजेत. यातच सर्वांचे भले आहे. पुढच्या पिढीला एक आदर्श समाज देण्यासाठी आपले हे कर्तव्य आहे.

– **अरविंद चावरिया** भा.पो.से.
पोलिस अधीक्षक, बुलडाणा

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| पार्श्वभूमी | ७ |
| हिंदुधर्म | १० |
| पारशी धर्म | १५ |
| बौद्ध धर्म | १९ |
| जैन धर्म | २३ |
| शीख धर्म | २६ |
| ख्रिस्ती धर्म | ३० |
| इस्लाम धर्म | ३४ |
| सर्व धर्मांचे समान सार | ३८ |
| शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी | ४१ |
| आधुनिकतेचा सदुपयोग | ४२ |
| आपली राज्यघटना आणि सर्वधर्मसमभाव | ४३ |
| मानवता हा एकमेव धर्म | ४४ |
| पोलिसांची भूमिका | ४७ |

# पार्श्वभूमी

सगळ्या धर्मात किती चांगली शिकवण आणि विचार आहेत, त्यांचा इतिहास आणि पार्श्वभूमी काय आहे, त्यांचे स्वरूप काय आहे; हे सगळे जाणून घेतल्यास कळेल की सगळे धर्म साधारणतः समान शिकवण आणि विचार देतात. प्रत्येकाची पद्धत आणि मार्ग वेगळे वाटत असले तरी ध्येय एकच आहे.

त्यासाठी आपण टप्प्याटप्प्याने माहिती करून घेऊ. ज्ञान माहिती आणि परिपक्व वैचारिक भूमिकाच एक आदर्श समाज घडवू शकते.

## धर्म म्हणजे काय?

विश्व, निसर्ग, मानवी जीवन आणि या सर्वांचे भवितव्य कोणतीतरी अलौकिक शक्ती नियंत्रित करते अशी माणसाची श्रद्धा असते. त्या अनुषंगाने आपल्या जीवनाशी सुसंगत, अनुकूल आणि जवळचा संबंध स्थापन करणारे विचार, तर्क आणि भावना समोर येतात, त्यातून वैयक्तिक आणि सामाजिक आचरणाचे नियम तयार होतात ते म्हणजे धर्म. त्या नियमविरुद्ध वागणे म्हणजे अधर्म. मग त्यात कालानुरूप आणि परिस्थितीनुरूप बदल होतात आणि तो विकसित होतो. त्याची स्वीकारार्हता वाढत गेली की त्याची व्यापकता वाढत जाते.

भावना, विचार, अनुभव, निरीक्षण, ज्ञान, इच्छा यातून तो तयार होतो असेही एक मत आहे.

शांतीची अपेक्षा, दुखा:तून मुक्तता, इच्छापूर्तीची अपेक्षा, नम्रता, शरणागती, अहंकार नष्ट होऊन आपण क्षुद्र किंवा कोणी नाही आणि आपण एक मर्यादेपलिकडे काहीच करू शकत नाही अशा भावना त्याच्या मुळाशी असतात.

त्या अलौकिक शक्तीला वश किंवा प्रसन्न किंवा अनुकूल करून घेण्याची इच्छा धर्मातील उपासना, साधना, प्रार्थना वगैरे गोष्टींना जन्म देते. त्यासाठीच मग धर्माचे आचरण करणे आणि अधर्म टाळणे सुरू होते.

## धर्म व समाज :

जागतिक पातळीवर अनेक वर्षे केलेले संशोधन, अभ्यास, सर्वेक्षण, विश्लेषण असे सांगते की पृथ्वीच्या पाठीवर सर्वात मागास समाजापासून ते सर्वात आधुनिक समाजापर्यंत धर्म व्यवस्था नाही असे कुठेही आढळत नाही. जिथे जिथे मानवी समाज आहे तिथे तिथे कोणता ना कोणता धर्म आहेच. कुठेही कोणत्याही समाजात धर्म न मानणाऱ्या नास्तिक व्यक्ती व त्यांच्या सामुदायिक संघटना खूप दुर्मिळ आणि अपवाद असल्याचे आढळते.

निसर्गाचे आणि आपल्या आयुष्याचे नियंत्रण करणाऱ्या शक्ती माणूस धर्मात मानतो, त्यांचा आदर करतो आणि त्यांचा त्याला धाकही वाटतो. सामाजिक जीवनाला व्यापक नियमबद्धतेची आवश्यकता असते. सामाजिक नियम माणसेच निर्माण करतात, परंतु त्याला धर्माची जोड दिली तर धर्माबद्दलचा आदर, धाक माणसांना सामाजिक नियम पाळण्यास भाग पाडतो आणि समाजात शिस्त, नैतिक वर्तन, कायदेपालन आणणे सोपे जाते. सामाजिक जीवनाचे नियंत्रण करण्यासाठीसुद्धा धर्माचा असा उपयोग होतो.


मात्र धर्माचा उपयोग काही स्वार्थी लोक वाईट हेतू पूर्ण करण्यासाठी करतात आणि सगळेच बिघडते. यासाठी समाजाने सुजाण, शहाणे होऊन परिपक्व विचाराने वागले पाहिजे. आपण जर सगळ्या धर्मांचा अभ्यास केला तर ते नक्की होईल.

- धर्माचा अभ्यास तीन अंगांनी करता येतो. पहिल्या भागात धर्माच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास म्हणजे त्या धर्माच्या मते जगाची उत्पत्ती, सृष्टीचे नियम, देव ही संकल्पना, मानव आणि निसर्ग व सगळ्याचा निर्माता यांचा संबंध याबाबतचे विचार.
- देवतांच्या कथा, धर्मातील रूढी परंपरा, उपासना आणि साधना तसेच तीर्थस्थाने, सणवार, उत्सव, विधी वगैरे यांचा विचार म्हणजे धर्माची दुसरी बाजू.
- धर्माच्या आचरणाचे नियम, त्यात अपेक्षित समाजरचना, नीती अनीतीचे नियम अशा गोष्टी म्हणजे धर्माचे तिसरे अंग.

सुरुवातीला आपण आपल्या देशातील प्रमुख धर्मांची माहिती थोडक्यात पाहू, ज्यायोगे आपल्याला त्यांची ओळख होईल आणि त्यांच्या धार्मिक व सामाजिक वर्तनाचा, परंपरा व विचारांचा संदर्भ लागेल.

सर्वांची एकमेकांशी अधिकाधिक ओळख हीच एकजुटीची पहिली पायरी आहे.




सागराप्रमाणे सगळे
प्रवाह सामावून घेणारा
हिंदुधर्म
तो सत्य, अहिंसा, दया, प्रेम,
अशा सद्‌गुणांवर
आधारलेला आहे.

हिंदू हा धर्म असण्यापेक्षा ती एक जगण्याची पद्धत आहे. जगातला सर्वात जुना धर्म, सर्वात जुनी संस्कृती आणि निसर्ग व आरोग्याची जपणूक करणारी आदर्श धर्म पध्दती अशी हिंदू धर्माची जगात ओळख आहे. कोणी प्रेषित, धर्म संस्थापक किंवा ग्रंथ अथवा अन्य प्रकारे तो निर्माण झाला असे न मानता हळूहळू विकसित झालेला तो धर्म आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ''हिंदू धर्म हा बहुरूपी आणि परस्परविरोधी प्रवृत्तींचे संमिश्रण होऊन बनलेला आहे. या धर्माच्या दोन बाजू आहेत. विशिष्ट प्रकारच्या सामाजिक चालीरीती किंवा समाज–रचनेचे विशिष्ट कायदे ही याची सर्वांत प्रमुख अशी बाजू आहे आणि परस्परविरोधी अनेक पारमार्थिक संप्रदाय ही त्याची दुसरी प्रमुख बाजू होय.''

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् म्हणतात, ''अनेक उपासना मार्ग, विविध उपास्य देवता, बहुविध धर्मद्रष्टे यांचा त्यात संग्रह आहे. हा धर्म व्यक्तिनिष्ठ नाही. हा विशिष्ट पंथाचा आग्रह धरीत नाही.''

''वेदांविषयी प्रामाण्यबुद्धी, साधनांची अनेकता आणि उपास्य दैवत कोणते असावे याविषयी निश्चित नियम नसणे, हे हिंदू धर्माचे लक्षण होय,'' असे लोकमान्य टिळक म्हणतात.

प्रपंच करतानाच परमार्थ साधण्याचा मार्ग अवलंबणे हेच हिंदू धर्माचे स्वरूप होय. परधर्माविषयी सहिष्णुता हे हिंदू धर्माचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. तो सत्य, अहिंसा, दया, प्रेम, अशा सद्‌गुणांवर आधारलेला आहे.

हिंदू हा शब्द फार जुना आहे. पंजाबजवळील सिंधु नदीच्या खोऱ्यात राहणाऱ्यांना हिंदू असे नाव पडले असा एक विश्वास आहे. मात्र हिंदू ग्रंथात त्यांना आर्य किंवा वैदिक धर्म म्हणतात.

धर्माच्या नियमानुसार आचरण सिंधु प्रदेशातील लोक करू लागले आणि ते हिंदू म्हणून ओळखले जाऊ लागले, असेही म्हटले जाते. सिंधू संस्कृतीच्या हडप्पा मोहेंजेदारो इथल्या अवशेषांतून सिंधू धर्माचे जे रूप प्रकट झाले आहे, ते हिंदू धर्माचे एक प्राचीन रूप होय, असे काही अभ्यासक म्हणतात.



आर्यांनी स्वतःचे वाङ्मय तयार केले होते. या वाङ्मयाला 'वेद' असे नाव आहे. सध्याच्या हिंदू धर्माची परंपरा आपणाला मागे वेदांपर्यंत नेता येते. वेदांच्या चार संहिता आहेत. त्यांना ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद अशी नावे आहेत. वेदात सांगितलेला महत्त्वाचा विधी म्हणजे यज्ञ होय.

वेदांमध्ये ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास असे जीवनाचे चार टप्पे चार आश्रम म्हणून सांगितले आहेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ या चार टप्प्यात पूर्ण होतात. समाजव्यवस्थेसाठी ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्ण यात अंतर्भूत होते.

रामायण व महाभारत ही महाकाव्ये हिंदू धर्मात महत्वाची आहेत. रचना झाली. महाभारतातील कृष्णाने अशा आध्यात्मिक व व्यावहारिक जीवनपद्धतीचा पुरस्कार केला की, जिच्यात सर्व लोक सहभागी होऊ शकत होते. त्यामुळे सगुण व समूर्त ईश्वराची भक्ती हिंदू धर्मात श्रेष्ठ मानली गेली.

कर्मवाद, पुनर्जन्म, स्वर्ग–नरक, कर्मफलामुळे सुरू होणारे कर्मचक्र या तत्वांना हिंदू धर्मात खूप महत्व आहे. शिव आणि शक्ती यांची उपासना प्राचीन हिंदू धर्मात केली जात असे. नंतर त्यात अनेक देवदेवतांची भर पडत गेली. वृक्ष, प्राणी, पक्षी तसेच अग्नी, पाणी, पृथ्वी, वायु अशा पंचमहाभूतांना ही देव मानले जाते.

गुढीपाडवा, होळी, नागपंचमी, पोळा, राखीपौर्णिमा, नवरात्र, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांत असे अनेक सण आणि व्रतवैकल्ये हे हिंदू धर्माचे वैशिष्ट्य आहे. चारधाम, बारा ज्योतीर्लिंग, शक्तीपीठे अशा अनेक तीर्थे आणि तीर्थयात्रांना हिंदू धर्मात मोठे महत्व आहे.

ओम, स्वस्तीक, अशी चिन्हे हिंदूत शुभ मानली जातात. जन्मापासून मृत्यूपर्यंत हिंदूत सोळा संस्कार आवश्यक मानले जातात.

हिंदू धर्मात वर्ण जेव्हा जन्मावर ठरू लागले तेव्हा चातुर्वर्ण्यही जातिजातींत विभागले जाऊन लोप पावले. हिंदू समाज हा आता जातींचा समूह होऊन गेला. त्यातून उच्च–नीच भेदभाव जन्माला आला.

बाराव्या शतकापासून आत्मोन्नती व मुक्ती यांच्यासाठी संसारत्याग न करता, किंबहुना नेटका संसार करून, पण मनाने विरक्त राहून भजन–पूजन–नामस्मरण यांच्याद्वारे परमात्म्याशी लीन व्हावे व मोक्ष मिळवावा, हा विचार जोमाने पुढे आला.

नाना जातिधर्मांचे संत स्त्री–पुरुष हिंदुस्थानच्या विविध भागांत निर्माण झाले. त्यांनी आपापल्या परीने भक्तिमार्गात उत्पन्न होणाऱ्या तात्त्विक प्रश्नांचा विचार केला. भक्तिमार्गाला भागवत धर्म असे मोघम किंवा सर्वसमावेशक नाव पडले.

महाराष्ट्रातील संतांनी वारकरी संप्रदाय निर्माण करून कर्मकांडांवर टीका करत भक्ती आणि नामस्मरणाचा मार्ग सांगितला. आदी शंकराचार्यांनी सुद्धा कर्मकांड आणि अनावश्यक गोष्टींवर टीका करत सुधारणा केल्या.

तीर्थांच्या यात्रा करीत आणि प्रवचने, कीर्तने, पुराणकथांचे विवरणकरीत अनेकांनी हिंदू धर्माचा संदेश निरनिराळ्या प्रदेशांत पोहोचवला.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदुस्थानात समाजसुधारकांची नवी धार्मिक चळवळ सुरू झाली. अनिष्ट रूढी परंपरा आणि अंधश्रद्धा नष्ट करण्याचे काम सुरू झाले. जातीभेद आणि उच्च नीच भेद अत्यंत चूक असल्याचे प्रबोधन सुरू झाले. त्यामुळे अनेक चांगले सामाजिक बदल घडले.

हिंदूधर्म हा उदार व समावेशक धर्म आहे. वेदांतात सर्वांमध्ये एकच आत्मा आहे असे अद्वैत सांगीतले आहे. दुसरी व्यक्ती असो की अन्य सजीव त्यात एकच आत्मा, एकच तत्व आहे, हे सांगत भेदभाव किती चूक आहे ते दाखवून दिले आहे.

जातीजातीत भेदभाव करीत काही स्वार्थी लोकांनी हिंदू धर्माचे चुकीचे रूप समोर आणले आणि समाजात दुही निर्माण केली. यासाठी सर्वांना आपल्या आणि दुसऱ्यांच्याही धर्माची माहिती असणे आवश्यक आहे.

**सर्वेपी सुखीनः संतु, सर्वे संतु निरामयाः**

**सर्वे भद्राणी पश्यंतू, मा कश्चित दुःखमाप्नुयात**

अर्थात सगळे सुखी रहावेत, सगळे निरोगी असावेत, सर्वांचे कल्याण व्हावे, कोणीही दुःखी असू नये असा विचार हिंदू धर्मात प्राचीन काळापासून केलेला आहे.

संत ज्ञानेश्वरांनी सुद्धा विश्वकल्याणासाठी पसायदान मागताना 'जो जे वांछील तो ते लाहो, प्राणीजात' अशी प्रार्थना केली आहे.

असा सर्वांना सुखी करण्याची इच्छा धरणारा आणि सागराप्रमाणे सगळे प्रवाह सामावून घेणारा हा हिंदू धर्म.



# परोपकार आणि सद्वर्तनाची शिकवण देणारा

# पारशी धर्म

पारशी धर्मात ऋजुता, प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा या गुणांना प्राधान्य आहे.

जगातील प्राचीन आणि महत्त्वाच्या धर्मांत पारशी धर्माची गणना होते. आज पारशी धर्माचे अनुयायी संख्येने खूप कमी असले, तरी त्यामुळे त्या धर्माचे महत्त्व कमी होत नाही. या धर्माच्या संस्थापकाचे नाव जरथुश्त्र किंवा झरतुष्ट्रहोय. ग्रीक भाषेत त्याला झोरोऑस्टर किंवा झोरोआस्ट्रस म्हटले जाते. त्यावरून इंग्रजी भाषेत हा धर्म झोरोअँस्ट्रीयन रिलिजन नावाने ओळखला जाऊ लागला. या धर्माचा उदय इराणमध्ये इ.स.पू. सातव्या शतकात झाला आणि त्याची भरभराट ससान घराण्याच्या अंतापर्यंत म्हणजे सुमारे बाराशे–तेराशे वर्षे झाली. ससान राजवटीत (इ. स. २२६–६५२) हा इराणचा राष्ट्रधर्म होता.

इराणमध्ये अनेक देवदेवता आणि निसर्ग शक्तींवर विश्वास असणारा धर्म प्रचलित होता. त्यावेळी मंत्र–तंत्र आणि जादूटोण्यावरही तसेच निष्पाप प्राण्यांचा आपल्या इच्छापूर्तीसाठी बळी देणे यावरही लोकांचा विश्वास होता.

झरतुष्ट्रचा जन्म इ. स. पू. ६३० ते ६१८ च्या दरम्यान झाला होता, असे बहुतेकांचे मत आहे. वयाच्या तिसाव्या वर्षी झरतुष्ट्रला ज्ञानप्राप्ती झाली आणि त्याने या अनिष्ट प्रथाविरुद्ध आवाज उठवला. लोकांचे प्रबोधन सुरू केले. त्याला तत्कालीन धर्मगुरू व शासनकर्ते यांचा खूप विरोध झाला. पण त्याने आपले काम सोडले नाही.

अखेर तो आपले गाव सोडून इराणच्या उत्तरपूर्व विभागात गेला. तिथे एका राजाने त्याला आश्रय दिला. मग झरतुष्ट्रला अनुयायी मिळत गेले, त्याच्या शिकवणीचा प्रसार होऊ लागला. झरतुष्ट्र हा पाश्चात्त्य राष्ट्रांना ज्ञात झालेला पहिला पौर्वात्य तत्त्ववेत्ता होय.

झरतुष्ट्र / पारशी धर्माची माहिती मुख्यत्वे अवेस्ता भाषेत लिहिलेल्या अवैस्तानामक धर्मग्रंथात व ससान राजवटीत लिहिल्या गेलेल्या पेहलवी भाषेतील वाङ्मयात आढळते.

झरतुष्ट्रची शिकवण एकेश्वरवादी आहे. झरतुष्ट्रने एकच देव असल्याचे मानले आणि त्याला अहुर मज्द असे नाव दिले.

मानवाची सत्कृत्ये जास्त असली, तर मृत्यूनंतर तो स्वर्गात जातो



आणि त्याने दुष्कृत्ये जास्त केली असली, तर तो नरकात जातो. असे हा धर्म मानतो.

पारशी लोक पृथ्वी, पाणी व अग्नी यांना अतिशय पवित्र मानीत असल्यामुळे मृतदेहाने त्यांना विटाळण्याची कल्पना त्यांच्या मनाला शिवत नाही. त्यामुळे मृतदेहाचे दहन किंवा दफन करण्याऐवजी तो एका विशिष्ट ठिकाणी पक्ष्यांना भक्ष्य म्हणून ठेवण्याची पद्धत त्यांनी स्वीकारली आहे

पारशी लोकांच्या धार्मिक आचारात अहुर मज्द व यझत यांची पूजाअर्चा करणे, रोज अवेस्ता ह्या धर्मग्रंथातील थोड्या भागाचे पठन करणे, पवित्र अग्नीचे रक्षण करणे, अग्निमंदिरातील अग्नीवर दिवसातून पाच वेळा चंदन वाहणे, नवजोत समारंभ करणे, गृहस्थाश्रम स्वीकारून प्रजोत्पादन करणे ह्या गोष्टींचा समावेश होतो.

वैयक्तिक आचारविचारांच्या बाबतीत पारशी धर्मात ऋजुता, प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा या गुणांना प्राधान्य आहे. द्रोह किंवा कपटाने वागणे अजिबात मान्य नाही. एक सामाजिक कर्तव्य म्हणून ज्यांना जरूर आहे त्यांना दान देणे आणि पाहुण्याचा आदरसत्कार करणे, यांना खूप महत्व आहे.

अहुर मज्दाची मानवाला मिळालेली गाय ही श्रेष्ठ देणगी असल्यामुळे तिचा वध न करता पशुपालन करावे आणि शेतीभाती करावी याला सर्वोत्तम मानले आहे.


सिकंदराचे आक्रमण (इ.स.पू. ३३०) आणि इस्लामी आक्रमण (इ. स. ६५२) यामुळे या धर्माच्या लोकांची खूप वाताहत झाली. हा धर्म इराणमधून नामशेष होऊ लागला.


सातव्या शतकात काही जरथुश्त्री लोकांनी आपला धर्म टिकवण्यासाठी देशांतर केले आणि ते भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर गुजरातेत येऊन पोहोचले. तिथून ते काहीसे उत्तरेकडे, काहीसे दक्षिणेकडे पसरले आणि आज त्यांची वस्ती मुख्यत्वे गुजरात–महाराष्ट्रात आहे. त्यांना येथे पारशी नावाने ओळखतात.

या धर्मात जोपासण्यासारखी काही चिरंतन तत्त्वे असल्यामुळे व त्याचे अनुयायी सत्प्रवृत्त राहिल्यामुळे हा धर्म देशांतर करावे लागले, तरी आपली उज्ज्वल परंपरा टिकवून आजही जिवंत राहिला आहे. सध्या भारतात जगातील सर्वाधिक पारशी धर्मीय राहतात. इराणी आणि पारशी हे दोन पारशी धर्माचे सर्वात मोठे संप्रदाय आहेत.

उत्तम विचार, उत्तम वाणी आणि उत्तम कृती ही तीन प्रमुख आचरण तत्वे हा पारशी विचारसरणीचा गाभा आहे.

भारतामध्ये उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणात चालना देण्याचे काम हे स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरही पारशी लोकांनीच केले. त्यांनीच भारतातील सुधारणा चळवळींमध्येही मोठे योगदान दिलेले आहे. शिक्षण संस्था, सामाजिक संस्था, संशोधन यांच्या उभारणीमध्ये त्यांनी फार मोठे योगदान दिलेले आहे




शांतता व विश्वकल्याणाची
कामना करणारा
बौद्ध धर्म
विश्वशांतीसाठी बौद्ध धर्माची
शिकवण अवघ्या जगासाठी
मार्गदर्शक ठरणारी आहे.

भारतात बुद्धपूर्वकाळात वैचारिक आणि सामाजिक अस्वस्थता होती. अनेक वाद प्रवाद होते. कर्मकांडांचे स्तोम माजले होते. बहुसंख्य जनता दु:खी, पीडित होती. एकमेकांशी वैर धरत लोक भांडत होते.

त्याच काळात (इ. स. पू. ५६३) राजा शुद्धोधनाचा पुत्र सिद्धार्थचा जन्म लुंबिनी इथे झाला. तरुणपणी त्याचा विवाह यशोधरा राजकुमारीशी झाला. त्यांना राहुल नावाचा पुत्र झाला. आजारपण, वृद्धत्व आणि मृत्यू या घटना आणि त्याने पीडित लोक पाहून सिद्धार्थ अत्यंत दु:खी झाला आणि त्या दु:खांची कारणे व उपाय शोधून लोकांना त्यातून मुक्त करण्यासाठी त्याने घरदार, परिवार, संपत्ती सगळ्याचा त्याग केला.

जंगलात राहून तप करू लागला.निरनिराळे ध्यान मार्ग, तपश्चर्येचे मार्ग यांचा अनुभव घेतल्यानंतर एके रात्री (वैशाख शुद्ध पौर्णिमेला) त्याला ज्ञान (संबोधी) प्राप्त झाले. त्याला दुःखाचे मूळ व ते नाहीसे करण्याचा मार्ग



सापडला. सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळाली. सिद्धार्थ आता बुद्ध झाला. आपल्या ज्ञानाचा उपयोग विश्वकल्याणासाठी करत त्याने गावोगावी उपदेश देणे सुरू केले आणि त्याचे लाखो अनुयायी झाले. भगवान गौतम बुद्धाच्या मधुर वाणीने शेकडो लोकांचे जीवन आमूलाग्र बदलले आणि मग त्यांचे अनुयायी वाढत गेले. जीवनाच्या कल्याणाचा मार्ग त्यांना सापडला. विश्वशांतीसाठी बौद्ध धर्माची शिकवण अवघ्या जगासाठी मार्गदर्शक ठरणारी आहे.

सर्व भारतीय धर्माप्रमाणे बौद्धांचाही कर्मावर व पुनर्जन्मावर विश्वास आहे. तेव्हा हे जन्ममरणाचे रहाटगाडगे कसे चालते, याचे स्पष्टीकरण करणारा प्रतीत्य–समुत्पादही त्यांना समजला. सर्व सृष्टीच नाशवंत आहे मग त्यापुढे मानवी जीवन तर क्षणभंगुर आहे आणि कोणतीही गोष्ट आपली समजणे, तिची इच्छा करणेच दु:खाचे मूळ आहे.

बौद्ध धर्मात खोटे बोलणे, लबाड वागणे, हिंसा, कोणाचे मन दुखावणे, लोभ करणे, द्वेष करणे, मद्यपान करणे, जुगार खेळणे, चोरी करणे,

कर्मकांड जादूटोणा अशा सर्व गोष्टींचा निषेध करून त्या पूर्णपणे त्यागण्याचे सांगितले आहे.

तुमच्या बुद्धीला पटले तरच हो म्हणा असे आवाहन केल्याने त्यांचे लाखों अनुयायी झाले. संन्यास घेऊन कोणी भिक्षू झाले तर संसारात राहून कोणी उपासक झाले.

जातीभेद, उच्च नीच विचार, सामाजिक भेदभाव यांना बौद्ध धर्मात काहीही स्थान नाही. सर्वांशी समान वागणूक, आदराने आणि प्रेमाने बोलणे, परोपकार करणे, शांततेचे मार्ग अवलंबणे असा उपदेश करण्यात आला आहे.

बुद्धाने सांगितले की जगात दु:ख आहे, ते तुमच्या आयुष्यात निर्माण होण्याला कारण आहे आणि त्याला निर्माण न होऊदेण्यासाठी तसेच नष्ट करण्यासाठी मार्ग आहेत.

बुद्धाने उपदेशिलेल्या मार्गावर तीन पायऱ्या आहेत : शील, समाधी व प्रज्ञा.


- **शील:** गृहस्थाश्रमी लोकांना पंचशील सांगितले आहेत. प्राणिहत्या, चोरी, लबाडी, परस्त्रीगमन व सुरापान न करणे. ह्यांपासून निवृत्ती सांगितली आहे. भिक्षूला आठ किंवा दहा प्रकारची शीले सांगितली आहेत. चांगले वागणे, बोलणे आणि नीतीच्या मार्गाने उपजीविका चालवणे यात सांगितले आहे.
- **समाधी:** चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रीत करून ध्यानधारणा करणे, मनावर आणि शरीरावर ताबा ठेवणे, सत्याप्रती सतत जागरूक राहणे म्हणजे समाधी.
- **प्रज्ञा:** सगळ्या चांगल्या गोष्टी समजाऊन घेणे आणि ज्ञान प्राप्त करणे.

भगवान बुद्धाने जगातल्या सर्व मानवच नव्हे तर पशू, पक्षी, झाडे, वनस्पती आणि सगळ्याच सजीवांप्रती करुणा, प्रेम, आस्था ठेवण्याची शिकवण दिली आहे.

बौद्ध धर्मग्रंथ पाली भाषेत आहेत. त्यात सूत्तपीटक, अभिधम्मपीटक आणि विनयपीटक हे त्रिपीटक मुख्य आहेत.

भगवान गौतम बुद्धाचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण या सगळ्या घटना पौर्णिमेला घडलेल्या आहेत. त्यामुळे बौद्ध धर्मात पौर्णिमेला महत्व आहे. त्या दिवशी उपवास, वंदना, पूजा वगैरे विधी केले जातात. वैशाख पौर्णिमा जगभरात साजरी केली जाते.

बौद्ध धर्माचे जगात कोट्यवधी अनुयायी आहेत. भारतात या धर्माला भारतरत्न आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले. जातीयता, अस्पृश्यता आणि अन्यायाच्या गर्तेत भरडल्या जाणाऱ्या लाखो लोकांना त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा दिली आणि त्यांच्या आयुष्यात समतेची आणि न्यायाची पहाट आणली.


अहिंसा आणि दयेचा
संदेश देणारा
जैन धर्म
‘परस्परोग्रहो जीवानाम’
म्हणजे सर्व सजीवांनी
एकमेकांवर उपकार करावेत हे
त्यांचे बोधवाक्य.

जिनचे अनुयायी ते जैन. जी म्हणजे विजय मिळवणे आणि जिन म्हणजे विजय मिळवणारा. आता विजय मिळवायचा कशावर तर विकारांवर आणि षडरिपुंवर. दिगंबर आणि श्वेतांबर असे दोन पंथ जैन धर्मात आहेत.




सृष्टीतील सर्व संजीवांची काळजी घेणे आणि आपल्यामुळे कोणालाही कधीही त्रास होऊ न देणे ही जैन धर्माची मुख्य शिकवण आहे. धार्मिक कर्मकांडांऐवजी श्रद्धा, भक्ती, उपासना, चांगली वर्तणूक यांना त्यात महत्व आहे.

शाकाहार, अहिंसा, शांती, वस्तूंचा मोह न धरणे, चोरी – मद्यपान न करणे, भोगवादी न होता परोपकार करणे अशी जैन धर्माची शिकवण आहे.

जैन धर्मात २४ तीर्थंकर झाले, त्यात ऋषभदेव हे पहिले आणि भगवान महावीर हे चोवीसावे तीर्थंकर होत. त्यांनी दिलेली शिकवण पाळणे म्हणजे या धर्माचे अनुसरण करणे. भगवान महावीरांची जयंती जैन धर्मीय मोठ्या उत्साहाने साजरी करतात.

जैन पृथ्वीकाय, अप्काय, तेजकाय, वायुकाय व वनस्पतिकाय असे पाच प्रकारचे जीव मानतात. मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधिज्ञान, मनःपर्ययज्ञान व केवलज्ञान हे ज्ञानप्रकार मानतात. श्रमणसंस्कृती ही प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. त्यात इंद्रिय निग्रह, परिग्रहत्याग, आत्मशुद्धी, अहिंसा, अचौर्य, यांना त्यात महत्व आहे. दानधर्म आणि त्याग तसेच साधी राहणी व परोपकार जैन धर्माची ओळख आहे.

**जैनांचे धार्मिक वाङ्मय :** जैनांचे वाङ्मय मूलतः प्राकृत भाषेत आहे. महावीरांनी आपल्या धर्माचा उपदेश अर्धमागधी भाषेत केला.

साधक – जैन धर्मात साधू, साध्वी, मुनी, आचार्य हे धार्मिक उपदेश करतात आणि समाजाला मार्गदर्शन करतात. त्यांचे जीवन अत्यंत साधे, परोपकारी असते. दीक्षा घेऊन सर्वसंगपरित्याग करून व्रतस्थ जीवन




जगणारे हे ज्ञानी उपासक अत्यंत आदरणीय असतात.

धर्माचरणाच्या बाबतीत जैन समाज अगदी काटेकोरपणे वागणारा आहे. ईश्वराची संकल्पना नसणारा मात्र सर्व जीवात ईश्वरी अंश मानणारा हा धर्म आहे. जैन धर्मात या तत्त्वामुळे जातपात, उच्च–नीच, स्त्री–पुरुष, गरीब–श्रीमंत असा भेद मानीत नाहीत.

परस्परोग्रहो जीवानाम' म्हणजे सर्व सजीवांनी एकमेकांवर उपकार करावेत हे त्यांचे बोधवाक्य आहे. उत्तमक्षमा, उत्तम मार्दव, आर्जव, शौच, संयम, तप, त्याग, अकिंचन, ब्रह्मचर्य, सत्य ही धर्माची १० लक्षणे सांगितली आहेत.

जैन धर्माने स्थापत्यकला, चित्रकला, मूर्तीकला, शिल्प, व्यापार, दानधर्म, समाजसेवा, अर्थव्यवस्था यात फार मोठे योगदान दिले आहे. संस्कृत, अर्धमागधी, मराठी, हिंदी, कानडी, तेलगू, गुजराथी अशा अनेक भाषांत साहित्य, तत्वज्ञान, विज्ञान, गणित, न्याय, ज्योतिष, व्याकरण, आयुर्वेद अशा विषयांवर जैन धर्माने प्रचंडलेखन करून ज्ञान भंडार निर्माण केले आहे. तत्वार्थसूत्र अथवा मोक्षशास्त्र या एकाच ग्रंथात ३६५ सूत्रात संपूर्ण जैन तत्वज्ञान सांगितले आहे.

अहिंसेचा जैन धर्माचा विचार जर सगळ्या जगाने स्वीकारला तर जागतिक शांतता निर्माण होईल. प्राणीमात्रच नव्हे तर अगदी सूक्ष्म कीटकांना सुद्धा आपला त्रास होऊ नये इतका व्यापक विचार करणार हा धर्म आहे.

शरीराबरोबरच मनाला शिस्त लावणारी, आपल्यापेक्षा इतरांचा विचार करणारी, पर्यावरण आणि एकूणच सृष्टीवर केवळ आपला अधिकार नसून ती सर्वांसाठी आहे असे सांगणारी शिकवण जैन धर्म देतो.

अनेक क्षेत्रात आपले ज्ञान, कौशल्य आणि कष्टाने यश व नावलौकिक मिळवणारे जैन धर्मीय जगभरात आहेत. देशाच्या जडणघडणीत आणि विशेषतः उद्योग, व्यापार, अर्थव्यवस्थेत त्यांचे मोठे योगदान आहे.

## मातृभूमी आणि मानव सेवेचे व्रत घेतलेला

# शीख धर्म

शीख जातीभेद, उच्च नीच भेद मानत नाहीत. सर्वांना समान वागणूक देतात.

शीख या शब्दाचा अर्थ शिष्य असा आहे. शीख धर्मानुसार परमेश्वर एक आहे आणि गुरुग्रंथसाहिब हा त्याचा पवित्र ग्रंथ आहे. आदिग्रंथ, गुरुबानी म्हणूनही हा ग्रंथ ओळखला जातो.

पंधराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत शिखांचे एकूण दहा गुरू आहेत. गुरू नानकदेव, गुरू अंगददेव, गुरू अमरदास, गुरू रामदास, गुरू अर्जुनदेव, गुरू हरगोविंद, गुरू हरराय, गुरू हरकिशन, गुरू तेगबहादुर, गुरू गोविंदसिंग.

या दहा गुरूंनी आपल्या शीख अनुयायांना आध्यात्मिकतेचा मार्ग दाखवला. गुरू गोविंदसिंग यांनी आपल्यानंतर आपल्या अनुयायांनी धर्म उपदेशक ग्रंथालाच गुरूस्थानी मानावे असा आदेश दिला. तेव्हापासून या ग्रंथास श्रीगुरुग्रंथसाहिब असे आदरपूर्वक संबोधले जाते.

गुरू गोविंदसिंगांनी शीख धर्माचा आध्यात्मिक क्षेत्रातील सर्वाधिकार ग्रंथसाहिबास आणि ऐहिक क्षेत्रातील सर्वाधिकार खालसा पंथास असल्याचा आदेश दिला.

**दीक्षाविधी :** अमृत किंवा शीख–दीक्षा प्रत्येक शिखाने घेणे आवश्यक आहे. दीक्षा कोणत्याही वयाचे स्त्री–पुरुष घेऊ शकतात. कोणत्याही देशातील, वंशातील किंवा सामाजिक थरातील स्त्री–पुरुषांना शीख धर्मतत्त्वांवर विश्वास असेल, तर दीक्षा घेण्याचा अधिकार आहे.

दीक्षा घेतलेल्या स्त्री–पुरुषांना पाच वस्तू बाळगाव्या लागतात. त्यात केस (लांब आणि न कापलेले केस), कंगा (कंगवा), कडा (लोखंडी किंवा स्टीलचे कडे), कच्छा (लांब विजार), किरपान (तलवार) यांचा समावेश आहे. शीख धर्मानुसार मद्यपान – तंबाखू – अमली पदार्थ सेवन, केस कापणे, व्यभिचार आणि एका विशिष्ट पद्धतीने ठार मारलेल्या पशुचे मांस खाणे चार गोष्टी निषिद्ध मानलेल्या आहेत.

**शिखांची आचारसंहिता :** शीख धर्माची आचारसंहिता ही श्रीगुरुग्रंथसाहिबाची शिकवण तसेच शीख परंपरा आणि संकेत यांवर आधारित आहे.



अपत्याचा जन्म, त्याचे बारसे किंवा नामकरण, दीक्षा (अमृत घेणे), विवाह, मृत्यू (अंत्यविधी) यांसंबंधीचे विशिष्ट संस्कारविधी शीख धर्मात असून त्यापैकी अमृतविधी सर्वांत महत्त्वाचा मानला जातो.

या सगळ्या विधीप्रकारांत श्रीगुरुग्रंथसाहिबमधील वचनांचे व मंत्रांचे पठण येते. शीख अंत्यविधीप्रमाणे मृत व्यक्तीला अग्नी दिला जातो आणि तिची रक्षा जवळच्या नदीमध्ये टाकली जाते.

वैवाहिक–कौटुंबिक जीवन नैसर्गिक, आदरणीय व आदर्श मानले जाते. श्रीगुरुग्रंथसाहिबाभोवती चार प्रदक्षिणा घालून शीख विवाहविधी साजरा केला जातो.

**धार्मिक सण–उत्सव :** शीख धर्मातील दहा गुरूंची जयंती,गुरुग्रंथसाहिब या पवित्र ग्रंथाचा प्रतिष्ठापना दिवस, ज्या दिवशी गुरू गोविंदसिंगजी यांनी दीक्षाविधी देऊन खालसा पंथ स्थापन केला तो दिवस सणासारखे साजरे केले जातात. गुरूंच्या पुण्यतिथीला ही धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

**शीख समाजामध्ये स्त्रीचे स्थान :** शीख समाजात स्त्रीला आदराचे स्थान असते. हुंडा मान्य नाही. स्त्रीला पुरुषाप्रमाणे सर्व अधिकार असतात.

**शिखांची पाच तख्त आहेत. ती अशी :** (१) अकाल तख्त (अमृतसर), (२) तख्त श्री हरिमंदिरसाहेब (पटणा साहेब), (३) तख्त श्री केशगढसाहेब (आनंदपूर), (४) तख्त श्री दमदमासाहेब (तळवंडी), (५) तख्त सचखंड श्री हुजूरसाहेब (नांदेड). यांपैकी अकाल तख्त हे सर्वांत श्रेष्ठ मानले जाते. गुरुद्वाराचे प्रशासकीय कामकाज शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीद्वारा करण्यात येते. प्रत्येक लहान मोठ्या गुरुद्वारा मध्ये लंगरच्या माध्यमातून प्रचंड अन्नदान केले जाते.

**तत्त्वज्ञान :** शीख धर्म एकेश्वरवादी असून ईश्वर हा स्वयंभू, सर्वव्यापी,

सर्वोच्च, एकमेव व अद्वितीय आहे, अशी शीखश्रद्धा आहे. शीख गुरू परमेश्वराला परमात्मा, परब्रम्ह असेही म्हणतात.

शीख जातीभेद, उच्च नीच भेद मानत नाहीत. सर्वांना समान वागणूक देतात. गुरू नानकदेव यांनी समाजाची अस्मिता जागृत करून त्यास समतेची शिकवण व नवीन दिशा दिली.


शीख धर्म मानव जातीच्या सेवेवर आधारलेला आहे. गुरू नानक म्हणतात, या जगात सेवा केल्यानेच तुम्हाला स्वर्गात जागा मिळेल'. शीख धर्मातील लोक प्रचंड दानधर्म आणि समाजसेवा करतात. सैन्यात आपले आयुष्य देऊन मातृभूमीची सेवा करण्यात ते कायम पुढे असतात.

सत्कर्म, सदाचार, दान, सेवा, त्याग, भक्ती, समानता, सत्य यावर हा धर्म आधारलेला आहे. देशाच्या विकासात, सैन्यदलात, अर्थव्यवस्थेत, समाजसेवेत त्यांचे मोठे योगदान कायम असते.

अत्यंत उदार मनोवृत्ती, देशविषयी प्रचंड प्रेम व अभिमान, प्रामाणिकपणा, दुसऱ्यांना मदत करण्यासाठी नेहमी तत्पर आणि खूप कष्टाळूपणा हे गुण शीख धर्मीय लोकात दिसतात.

जगात सर्वत्र पसरलेले शीख लोक आपल्या कर्तृत्वाने जातील तिथे यश मिळवतात.




शत्रूवरही प्रेम करण्यास
शिकवणारा
ख्रिस्ती धर्म
शत्रूवरदेखील प्रेम करण्यास
ख्रिस्त धर्म सांगतो.

ख्रिस्ती धर्मास दोन हजार वर्षांची परंपरा आहे. जगात खूप जास्त लोकसंख्या असलेला हा धर्म आहे. या धर्माच्या उदयापासूनच त्याचा भारतात प्रसार झाला आहे.

**येशू ख्रिस्ताची ओळख :** ख्रिस्ती धर्म अथवा ख्रिस्ती विश्वास याचे थोडेतरी ज्ञान होण्यासाठी येशू ख्रिस्ताची माहिती असणे आवश्यक आहे. पॅलेस्टाइनमधील जेरूसलेमजवळील बेथलीएम नावाच्या लहानशा गावात एका यहुदी कुटुंबात येशू ख्रिस्ताचा जन्म झाला.

त्या वेळची प्रचलित धर्मपद्धती ही फार कर्मठ बनली होती. लोकांना त्या धर्मपद्धतीपासून कसला आनंदही होत नव्हता व आशाही वाटत नव्हती.

वयाच्या २७–३० च्या दरम्यान त्याने लोकांना शिक्षण देणे व रोगमुक्त करणे अशा सेवाकार्याला प्रारंभ केला. परमेश्वर व मानवाविषयीचे खरे ज्ञान त्याने आपल्या सभोवतालच्या मानवांना करून दिले. मानवाच्या कल्याणाचा मार्ग सांगितला. कधीकधी येशू ख्रिस्ताचे वर्णन एक थोर सुधारक म्हणून सुद्धा करण्यात येते.



सर्वसामान्य जनता येशू ख्रिस्ताची प्रवचने आनंदाने ऐकत असे. कारण सर्वसामान्य लोकांच्या मनावरचे धर्माचे दडपण त्याने कमी केले. त्याने धर्म अधिक साधा व अर्थपूर्ण केला.

प्रस्थापित धर्म आणि राजसत्ता यांची अन्याय्य वागणूक, धर्माच्या नावाखाली चाललेली लूट आणि शोषण तसेच अनेक अनिष्ट रूढी, प्रथा, धार्मिक विधी यांच्यावर टीका करून ते कसे चूक आहेत हे येशूने सांगितले. त्यामुळे त्याच्या विरुद्ध प्रस्थापितांनी कारवाई करत त्याचा छळ केला आणि त्याला लाकडी क्रुसवर हातापायाला खिळे ठोकून त्याची हत्या केली. मात्र मरताना सुद्धा त्याने आपल्या मारेकऱ्यांनाही माफ केले.

सण:येशूच्या जन्माचा दिवस ख्रिसमस अथवा नाताळ जगभरात साजरा केला जातो. अनेक देशात तो दहा दिवसांचा उत्सव असतो.

येशूच्या मृत्यूचा दिवस म्हणजे गुड फ्रायडे आणि नंतर तिसऱ्या दिवशी तो पुन्हा येवून शिष्यांना भेटून गेला तो ईस्टर संडे अथवा येशूचा पुनरुत्थान दिन.

परमेश्वर मानवी देह धारण करून स्वतः मानव होऊन ह्या पृथ्वीवर आला, हा चर्चचा सर्वांत महत्त्वाचा धर्मसिद्धांत आहे.

**पाप :** आपल्या अहंकारी स्वभावामुळे मानव परमेश्वरापासून विभक्त होण्याची इच्छा बाळगतो असे या धर्मात समजतात.

**पश्चाताप :** पश्चाताप पावल्याने येशू ख्रिस्ताद्वारा प्रकट झालेल्या परमेश्वराच्या प्रीतीचा आपणाला प्रत्यक्ष अनुभव येतो.

ट्रिनिटी हा धर्मसिद्धांत परमेश्वराचे त्रिविध स्वरूप समजावून सांगतो.

इतर धर्मांप्रमाणेच ख्रिस्ती धर्मातही विशिष्ट कर्मकांडाचा, विधींचा व संस्कारांचा अंतर्भाव झालेला आहे.

**उपासना :** सामुदायिक उपासना व प्रार्थना दर रविवारी सकाळी किंवा सोयीच्या वेळी चर्चमध्ये धर्मगुरूच्या (फादर) मार्गदर्शनानुसार केली जाते.

**बाप्तिस्मा:**हा ख्रिस्ती धर्मातील महत्त्वाचा संस्कार असून तो झाल्यावरच खऱ्या अर्थाने व्यक्ती ख्रिस्ती धर्माची अनुयायी होते. ख्रिस्ती धर्मातील हा आवश्यक असा दीक्षाविधी म्हणता येईल.

**विवाह :** ख्रिस्ती विवाह हा नोंदणी विवाह आहे. प्रचलित कायद्याप्रमाणे उपासनेच्या वेळी वधू वरांची नावे, पत्ता, चर्चचे सभासदत्व, लग्न लावणाऱ्या धर्मगुरूचे नाव व पत्ता, लग्नाची तारीख व वेळ, सूचनापत्राद्वारे वाचून दाखवितात.

विवाहाच्या वेळी अंगठी घालणे, एकमेकांशी निष्ठेने राहण्याचे सर्व समाजापुढे अभिवचन देणे वगैरे झाल्यावर लग्न लावणारा धर्मगुरू तुम्ही पतिपत्नी झाला आहातअशी जाहीर आज्ञा करून हा विधी संपतो.

**अंत्यविधी :** मृताच्या घरी किंवा चर्चमध्ये धर्मगुरू प्रसंगास अनुरूप असे गीत गावयास सांगतो व नंतर शास्त्रभाग वाचून प्रार्थना करतो. मृताचे शरीर लाकडी पेटीत ठेवून दफन केले जाते.


**धर्मग्रंथ :** येशूच्या जन्माआधीची माहिती म्हणजे जुना व जन्मानंतरचा नवा करार मिळून तयार बायबल हा धर्मग्रंथ आहे.

**शिकवण :** बंधुप्रेम, समता, इतरांचे कल्याण व्हावे या भावनेने वागावे. धर्म व प्रत्यक्ष कृती यांची सांगड घालावी. या सर्वांचा पाया प्रेमावर आधारित असावा. या प्रेरणेने व ध्येयाने कार्य करणे आणि त्याचे फळ परमेश्वर योग्य वेळी व योग्य प्रमाणात देईल असा विश्वास बाळगणे.

आपल्यावर झालेले अन्याय विसरणे. शत्रूवरदेखील प्रेम करण्यास ख्रिस्त धर्म सांगतो. कोणाचे दोष काढू नका, कोणाचे मन दुखवू नका, सत्याने आणि नीतीने वागा अशी शिकवण हा धर्म देतो. जगभरात या धर्माचे अनुयायी आहेत.

बहुसंख्य युरोपीय देश ख्रिस्त धर्मीय आहेत. आधुनिकता, वैज्ञानिक शोध, शिस्त, कष्टाळूपणा त्यांच्यात असतो. अनेक स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून जगभरात समाजसेवा आणि शिक्षणाचे कार्य ते पार पाडत असतात.

कोणी आपल्याला थप्पड मारली तर राग न मानता त्या व्यक्तीला माफ करा, इतकेच नव्हे तर तिची अडचण विचारून ती सोडवा असा उदात्त विचार हे धर्म देतो आणि सगळ्यांवर प्रेम करायला शिकवतो.


शिस्त आणि शांततेची
शिकवण देणारा
इस्लाम धर्म
प्रत्येक मुसलमानाने धार्मिक,
शांततापूर्ण जीवन व्यतीत
केले पाहिजे,
अशी इस्लामची अपेक्षा



इस्लाम धर्मसंस्थापक मुहंमदांचा कालखंड इ. स. ५७१ ते ६३२ हा होता. सबंध अरबस्तानचे धार्मिक तीर्थक्षेत्र आणि सर्वांत मोठे व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या मक्का शहरात ते जन्मले. त्यांच्या जन्मापूर्वी शेकडो वर्षे अरबस्तानावर रोमन आणि इराणी साम्राज्याची अधिसत्ता होती.

मक्केची यात्रा हा त्या काळीही अरब जीवनातील एक महत्वाचा भाग होता. मक्का शहरावर कुरैश जमातीचे वर्चस्व होते. कुरैशांच्या बानी हशिम या घराण्यात मोहम्मद पैगंबरांचाजन्म झाला.

त्या काळातही अरबी भाषा बरीच प्रगत होती. अनेक सुंदर कवने, लोकगीते आणि पोवाडे लोकांच्या जिभेवर असत. इतर मागासलेल्या समाजांत जशा अनेक खुळ्या समजुती आणि रीतिरिवाज असत, तसेच

वेगवेगळ्या अरब जमातीतही ते प्रचलित होते. अरबी भाषा आणि मक्केचे तीर्थस्थान हेच त्यांना एकत्र जोडणारे दुवे होते.

प्रत्येक टोळीतील लोक एकमेकांविषयी बंधुभावाने वागून टोळीची एकजूट अभेद्य राखीत. टोळीप्रमुखं सर्वांत वयोवृद्ध आणि शहाणा असा निवडला जात असे. त्याच्या आज्ञा सर्वजण मानीत. परंतु इतर टोळीवाल्यांशी मात्र त्यांचे जवळजवळ हाडवैरच असे आणि त्यामुळे टोळीवाल्यांच्या आपापसात सदोदित लढाया चालत.

पैसा कमावण्यासाठी श्रीमंत लोक फसवाफसवीही करीत असत. देवस्थानसुद्धा यापासून मुक्त नव्हते. सावकारी पाशांनी गरीब जमातींना जखडून टाकले होते. अन्याय, अत्याचार, लूट, लोभ, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरा यांचा अतिरेक झाला होता.

वयाच्या चाळीसाव्या वर्षी नेहमीप्रमाणे मक्केजवळील हिरा टेकडीवर ध्यान करीत असता मुहंमदांना देवदूताचे दर्शन झाले. त्याच्याकरवी मुहंमदांना ईश्वरी संदेश वाचण्याची आज्ञा झाली. तेव्हापासून पुढील बावीस वर्षे अधूनमधून त्यांच्या मुखातून उत्स्फूर्त अशी वाणी बाहेर पडत असे. त्याचा संग्रह कुराण (कुर्‌आन) म्हणून प्रसिद्ध आहे.

अत्यंत सोप्या भाषेत त्यानी लोकांना इस्लाम धर्म शिकवला. पैगंबरांनी सत्य, नीती, सेवा, श्रद्धा, यांची शिकवण दिली.

**श्रद्धेय तत्त्वे आणि महत्त्वाच्या संकल्पना :** इस्लाम' या शब्दाचा अर्थ परमेश्वरावर नितांत श्रद्धा, त्याच्या इच्छांचे व आज्ञांचे पालन, ईश्वराला संपूर्ण शरणागती' हा होय. विश्वामध्ये फक्त एकच ईश्वर आहे. सारे विश्वच त्याने निर्माण केले आहे.

मुहंमद पैगंबर हे परमेश्वराचे अखेरचे प्रेषित होते. मुहंमदांमार्फत आलेला ईश्वरी संदेश अधिकृतपणे लिहून ठेवलेला आहे. त्यात गेल्या तेराशे वर्षांत कानामात्रेचाही फरक झालेला नाही.

**धर्मग्रंथ कुराण :** हे गद्यकाव्य ६,२२६ आयतांचे (श्लोकांचे) असून ते ११४ सूरांमध्ये (अध्यायांत) संपादित केलेले आहे.

मुस्लिमांमध्ये शिया व सुन्नी हे मुख्य पंथ आहेत. भारतात बाराव्या

आणि तेराव्या शतकांत जे इस्लामी साम्राज्य स्थापन झाले, त्या साम्राज्यात सूफी संतांचा फार मोठा प्रभाव होता.

**आचारविचार आणि व्यावहारिक सामाजिक नियम :** प्रत्येक मुसलमानाने धार्मिक, शांततापूर्ण जीवन व्यतीत केले पाहिजे, अशी इस्लामची अपेक्षा असते.

**आवश्यक धार्मिक आचरणात पुढील बाबींचा समावेश होतो :**

कलमा पढणे, पाच वेळा नमाज पढणे, मुलांची सुंता करणे, शुक्रवारी मशिदीत सामूहिक नमाज पढणे, रमजान चे उपवास करणे, रमजानमध्ये दानधर्म करणे, आयुष्यातून एकदा तरी मक्केची यात्रा करणे. बहुपत्निवकत्वाची चाल अद्यापि मुस्लिमांत अस्तित्वात आहे.

पैगंबरांनी कुराणात दिलेल्या शिकवणीत खोटे बोलू नये, कोणाला फसवू नये, कर्ज वेळेवर फेडावे, व्याजाची कमाई करू नये, मद्य, अफू, डुकराचे मांस व जुगार यांपासून दूर रहावे, अशी शिकवण आहे.

रमजान ईद, बकरी ईद, मोहर्रम आदी सण मुस्लिम समाजात महत्वाचे असतात. रमजानच्या महिन्याला खूप पवित्र समजले जाते.





# सर्व धर्मांचे समान सार

प्रत्येकाचे मार्ग आणि पद्धत वेगळी असली तरी ध्येय एकच आहे, कृती वेगळी असली तरी उद्देश समान आहे, साधने भिन्न असली तरी साधावयाची गोष्ट एकच आहे. धर्म अनेक असले तरी त्यांच्या मुळाशी असणारी तत्वे सर्वत्र सर्वकाळ समान आहेत.


सर्वांना सामावून घेत सहिष्णुता शिकवणारा हिंदू धर्म आपण पहिला. शेकडो जाती, अनेक पंथ आणि असंख्य देवतांना व अगणित रूढी परांपरांना एकाच समान धाग्याने व्यापत हिंदू धर्म विविधतेत एकता साधण्याचा संदेश देतो. एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' म्हणत शांततेच्या मार्गावर जाण्याची शिकवण देतो.

तर सत्य, अहिंसा आणि शांतीची पताका घेत जैन धर्म येतो. आपले आचरण शुद्ध ठेवा अशी शिकवण देताना परोपकाराचा मंत्र देतो.

चारित्र्य, नीतीमत्ता आणि त्यागाची अनमोल देणगी बौद्ध धर्म देतो. कशाचीही हाव न धरता कोणत्याही गोष्टीसाठी दुसऱ्याला त्रास न देण्याची शिकवण देतो.

दानधर्म आणि मानवसेवेला प्राधान्य देणारा पारशी धर्म, आपण जाऊ तिथले होऊन सर्वांना आपलेसे करण्याचे उदाहरण समोर ठेवतो.

शत्रूवरसुद्धा प्रेम करा म्हणणारा आणि दुसऱ्याच्या सुखासाठी आपण सहनशील क्षमाशील होण्याचा उदात्त मार्ग ख्रिश्चन धर्म आपल्याला दाखवतो आणि महान त्यागाची शिकवण देतो.



देशासाठी प्राण देण्यात अग्रेसर, सेवा आणि नीतीमत्ता यांना प्राधान्य देणारा शीख धर्म आपल्याला दुसऱ्यासाठी जगण्याचा धडा देतो आणि शौर्यासह मानवतेची पाठराखण करतो.

व्यसनांपासून आणि फसवणुकीपासून दूर राहत धर्माने वागण्याची शिकवण मुस्लिम धर्म देतो. कोणावरही अन्याय न करता आपल्या उत्पन्नातून गरजूंना मदत करण्यास शिकवतो.

एकाच समान सूत्रात गुंफलेली ही बहुरंगी, बहुढंगी, मनोहारी मोत्यांची माळ भारतमातेच्या गळ्यात शोभून दिसते. सत्य आणि नीतीने वागत, वाईट गोष्टींपासून दूर राहत आपल्याआधी दुसऱ्याचा विचार करा अशी संवेदनशील शिकवण प्रत्येक धर्मात आढळते.

प्रत्येकाचे मार्ग आणि पद्धत वेगळी असली तरी ध्येय एकच आहे, कृती वेगळी असली तरी उद्देश समान आहे, साधने भिन्न असली तरी साधावयाची गोष्ट एकच आहे. धर्म अनेक असले तरी त्यांच्या मुळाशी असणारी तत्वे सर्वत्र सर्वकाळ समान आहेत.

आपल्या धर्माच्या अस्तित्वासाठी, प्रचारासाठी, वर्चस्वासाठी किंवा आपलीच सत्ता असावी यासाठी दुसऱ्या धर्माचा अनादर करा, अन्य धर्मीय लोकांशी शत्रुत्व करून त्यांना त्रास द्या, हिंसाचार अन्याय लूटमार करा असा कोणताही धर्म शिकवत नाही, सांगत नाही, असे कोणत्याही धर्मग्रंथात लिहिलेले नाही किंवा कोणत्याही धर्मात असा उपदेश केलेला नाही. उलट अशी कोणतीही गोष्ट करू नका ज्याने दुसऱ्याला त्रास होईल हेच प्रत्येक धर्माने सांगितले आहे.

मग धर्माच्या नावाने भांडणतंटे, वाद संघर्ष, दंगली, जाळपोळ, तोडफोड, लूटमार, हत्या कशासाठी आणि कोणासाठी? विचार करा खोलवर आणि सुविचार बिंबवा मनावर!

आपल्या आणि इतरांच्या धर्माची माहिती, पार्श्वभूमी, अभ्यास नसताना कोणातरी माथेफिरू अथवा स्वार्थी व्यक्ती किंवा तशा संघटनेच्या सांगण्यावरून जर आपण धर्माच्या नावाखाली कुकृत्य करत असू तर आपला, इतरांचा आणि माणुसकीचा धर्मही कधी क्षमा करणार नाही.

# शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी



देश नेहमी नव्या पिढीकडे आशेने आणि अपेक्षेने पाहत असतो. भारत हा आज जगात सर्वाधिक तरुण लोकसंख्या असणारा देश आहे आणि पुढेही अनेक वर्षे राहणार आहे. या पिढ्या घडवताना घरात, समाजात, शिक्षण संस्थात जर त्यांना धर्मनिरपेक्षतेची शिकवण आणि संस्कार दिले गेले, त्यांच्या मनात सर्व जाती धर्मांबद्दल आदर आणि आपुलकी रुजवण्यात आली, तर भविष्य फार उज्ज्वल आणि समृद्ध होऊ शकेल.

मातीच्या गोळ्याला आकार देत सुंदर भांडे घडवायचे असते. मुलांच्या मनाला सुंदर विचार, ज्ञान आणि संवेदनशीलतेने घडवले तर उद्या जेव्हा देश त्यांच्या हातात असेल तेव्हा ते त्याला प्रगतीच्या विचारांनी पुढे नेतील आणि जाती धर्माच्या तंट्यात देशाचे नुकसान होणार नाही, त्यामुळे देशात होऊन गेलेल्या महान व्यक्तींच्या स्वप्नातील देश घडेल.

पालक आणि शिक्षक यांच्यासोबतच समजाचीही ही जबाबदारी आहे की, किशोरवयीन मुले आणि तरुणांना सद्विचारांची शिकवण आणि उपदेश द्यावा. आपल्या जाती धर्माइतकेच अन्य जाती धर्मांना महत्व आहे आणि मुळात सर्वांची शिकवण एकच आहे हे त्यांना समजावले पाहिजे.

ती पिढी पुढच्या पिढीला जेव्हा अशीच शिकवण देईल तेव्हा हा संस्कार समाजात खोलवर रुजायला सुरुवात होईल.

# आधुनिकतेचा सदुपयोग



आजकालचा काळ हा आधुनिक तंत्रज्ञान, इंटरनेट आणि सोशल मिडियाचा आहे. त्याचा उपयोग अनेक क्षेत्रात क्रांतीकारी प्रगती करण्यासाठी होतो आहे, मात्र नाण्याची दुसरी बाजू पाहिल्यास असे दिसते की, तरुणांना बिघडवणारे हेच तंत्रज्ञान आणि सोशल मीडिया आहेत.

अफवा असोत की माथी भडकवणारे संदेश; एकमेकांच्या कुरापती काढणारे संवाद असोत की विष पसरवणारे छायाचित्रे अथवा व्हिडिओ सगळे सोशल मिडीवरूनच पसरतात आणि त्याचे परिणाम समाजाला भोगावे लागतात. ज्यांचा त्या घटनेशी किंवा मुद्याशी दूरान्वयानेही संबंध नाही त्यांचे आयुष्य मात्र धोक्यात येते.

तंत्रज्ञान असो की संवादाची आधुनिक साधने, ती सगळी माणसाचे आयुष्य सोपे, कालानुरूप आणि सुखी होण्याच्या उद्देशाने तयार केलेली असतात. पण त्यांचा नेमका उलटा वापर केला जातो.

आपण एकमेकांशी संवाद साधून आपल्या देशासाठी काय चांगले करता येईल, गरजवंताना कशी मदत करता येईल यासाठी त्यांचा वापर केला जाणे अपेक्षित आहे.

अगदी असे नाही जमले तरी निदान त्यांचा गैरवापर तरी करू नये. शिक्षण कौशल्य आणि ज्ञान मिळाल्यावर जी परिपक्वता येणे अपेक्षित आहे, त्यात हे कुठेच बसत नाही.

चला निर्धार करूया की सोशल मिडियाचा वापर आपण आजपासून अत्यंत जबाबदारीने करू.


# आपली राज्यघटना आणि सर्वधर्मसमभाव

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार होत. सर्व जाती धर्मांना सन्मानाची, समानतेची, बंधुभावाची वागणूक देणारी आणि सर्वांना एकजुटीने देशाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा राज्यघटना आपल्याला देते. आपली राज्यघटना हाच सर्व भारतीयांचा खरा धर्मग्रंथ आहे.

असंख्य जाती, पंथाना सामावणारे अनेक धर्म, अनेक भाषा आणि संस्कृतीचे एकाच ठिकाणी वास्तव्य, भूतकालीन आणि वर्तमान स्थितीत प्रचंड विविधता असणाऱ्या गटांचा समावेश असणाऱ्या या देशासाठी एक आदर्श, विचारपूर्ण आणि परिपूर्ण राज्यघटना हे आपले वैभव आहे. वैचारिक आणि सांस्कृतिक समृद्धतेसह कायदा आणि न्यायाची पक्की बैठक असणारे हे वैभव आपल्या एकमेवाद्वितीयत्वाची खूण आहे.

जी राज्यघटना या प्रचंड वैविध्य असणाऱ्या देशाला एका समान सूत्रात बांधून शिस्त लावते. सर्वांच्या कल्याणासाठी आणि शांतता सुव्यवस्थेसह देश चालवला जावा यासाठी अत्यंत योग्य मार्गदर्शन करते, त्या राज्यघटनेचे काटेकोर पालन करणे आपले केवळ कायदेशीर नव्हे तर नैतिक आणि सामाजिक कर्तव्य आहे, यात शंका नाही.

मग तिने आपल्याला सर्व जाती धर्मांना समान सन्मान आणि समान



वागणूक देण्याचे सांगितले असताना आपण धार्मिक तेढ वाढवणे, त्यात सामील होणे, मदत करणे कितपत योग्य आहे?

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातला भारत हा आपल्या भल्यासाठी निर्माण व्हावा अशी त्यांची निस्वार्थ अपेक्षा होती. ती पूर्ण करणे आपले कर्तव्य नाही का?

आपण काही फार अवघड करणे अपेक्षित नाही. आपण आपल्या घरात, आजूबाजूच्या समाजात हे विचार रुजवत आपले शहर असे आदर्श केले तर एक एक करत पूर्ण देश अशा विचारांनी भरून जाईल.

प्रत्येकाने जर राज्यघटनेप्रमाणे आपली वागणूक ठेवली तर देशात सर्वत्र सुख नांदेल. ना कोणी कोणाचा द्वेष करेल ना कोणी कोणाला हीन समजेल. सगळ्या जाती आपल्याच सारख्या आहेत आणि सर्व धर्म आपल्याच धर्मासारखे आहेत ही भावना सामाजिक सलोखा आणि ऐक्याला बळ देईल.

## मानवता हा एकमेव धर्म

इंग्रजांनी सगळा भारत लुटून नेला पण जाताना देशाची फाळणीही केली, इतकेच नव्हे तर अनेक शतके गुण्यागोविंदाने राहत असलेल्या हिंदू मुस्लिम समाजात विषवल्ली लावली, ज्यामुळे पुढच्या अनेक पिढ्या त्याचे भोग भोगत राहिल्या आहेत.

जातीय आणि धार्मिक दंगली यांचा शाप देशातल्या सगळ्या गांव शहरांनी सहन केला आहे. इंग्रजांच्या या विषाला नंतर स्वार्थी लोकांनी खतपाणी घालून या सामाजिक दुही आणि वैराचा उपयोग आपली पोळी भाजून घेण्यासाठी केला तो आजतागायत.

दुर्दैवाने जनतेची सहनशीलता, विचारक्षमता, सारासार समजूतदारपणा आणि परिपक्वता वाढण्याऐवजी कमी होत गेली आणि राज्यघटनेची शिकवण

लोक विसरत चालले.

कोणतेही क्षुल्लक कारण समाजकंटकांना पुरते, नव्हे ते स्वतः कारण निर्माण करतात आणि संघर्ष घडवून आणतात. एरवी मैत्रीने वागणारे लोक नको त्याच्या नादी लागून अचानक भडकतात.

कोणत्याही घटनेला, वादाला धार्मिक रंग द्यायचा आणि समाजाला चुकीच्या दिशेने न्यायचे ही गोष्ट इतक्या सफाईने केली जाते की खरे सूत्रधार कायम पडद्यामागे राहतात आणि निष्पाप नागरिकांचे आर्थिक नुकसान तर होतेच शिवाय जीवाला विनाकारण धोका निर्माण होतो.

दंगलीमुळे सार्वजनिक आणि खासगी मालमत्तेचे अपरिमित नुकसान होते, अनेकांना जीव गमवावा लागतो, अनेक अपंग होतात आणि समाजात विनाकारण द्वेष धुमसत राहतो.

दंगली होणाऱ्या शहराची बदनामी होते, तिथे उद्योग व्यापार सुरू करण्यास किंवा आर्थिक गुंतवणुकी करण्यास लोक उत्सुक होत नाहीत. परिणामी प्रगती खुंटते, बेरोजगारी वाढते, मग गुन्हेगारी गरीबी वाढते.



ज्यांचा काहीही दोष नाही अशा नागरिकांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष खूप नुकसान सोसावे लागते.

पोलिस असो की प्रशासन त्यांच्यावर नेहमीच्या कामाबरोबरच हा अतिरिक्त ताण येतो आणि मग जनतेच्या समस्या आणखी बिकट होत जातात. कायदा आणि सुरक्षितता धोक्यात आल्याने सामाजिक स्थिती आणि शहरातील वातावरण दुषीत होते.

कोणत्याही दृष्टीने अशा घटना आपलेसाठी चांगल्या असूच शकत नाहीत. जनतेने विशेषतः तरुणांनी अशा कोणत्याही समाज कंटकांच्या बोलण्यात न येता आपल्या बुद्धीचा आणि सारासार विचारसरणीचा वापर करावा.

कोणत्याही धर्मात अशा हिंसाचारी आणि विध्वंसक कामाला अथवा द्वेषाला स्थान नाही. उलट प्रत्येकधर्म शांतता, क्षमा आणि दुसऱ्याविषयी संवेदनशीलता राखण्याची शिकवण देतो.

आपले शहर आणि शहराची प्रतिमा ही इथल्या प्रत्येक नागरिकासाठी अभिमानाची आणि अस्मितेची बाब असली पाहिजे. आपल्या शहराचा आणि परिसराचा विकास हाच आपला विकास असून दंगली, जातीय संघर्ष, धार्मिक वाद यामुळे त्यात अडथळे येऊन आपलेच नुकसान होते, यासाठी समाजात ही जागरूकता निर्माण होऊन ती खोलवर रुजणे आवश्यक आहे.

जेव्हा आपल्या भडकवण्याचा परिणाम होत नाही हे कळेल तेव्हा समाजकंटकांना खरा धडा मिळेल.



# पोलिसांची भूमिका




गुन्हेगारांना पकडणे आणि गुन्ह्याचा तपास करणे इतक्या पुरतेच पोलिसांचे काम मर्यादित नसते. कायदा व सुव्यवस्थेची स्थिती राखण्यासह त्यांना अनेक कर्तव्ये असतात. सामाजिक शांतता व सलोखा ठेवण्यासाठी विविध जाती धर्मातील लोक, त्यांच्या संघटना, त्यांचे प्रतिनिधी यांच्याशी संपर्क समन्वय ठेवत कोणत्याही अस्थिरतेच्या आणि संघर्षाच्या वेळी त्यांच्या सहकार्याने परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे कामही पोलीसच करतात.

शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, व्यावसायिक पातळीवर नागरिकांशी संवाद साधत शहराची स्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी ते सतत वेगेवगळे उपक्रम राबवत असतात. आपली दैनंदिन कर्तव्ये पार पाडतानाच कोणत्याही घटनेला अप्रिय वळण लागू न देता समुपदेशन करणे, योग्य माहिती आणि वस्तुस्थिती काय आहे त्याची माहिती देणे, प्रसंगी कठोर पावले उचलणे अशा मार्गांनी पोलिस कायम कायदा आणि सुव्यवस्थेवर आपली पकड ठेवतात.

धार्मिक आणि सामाजिक सौहार्द हे ध्येय बाळगून प्रत्येक जाती धर्माच्या सणवार – अन्य महत्वाचे दिवस किंवा विशेष कार्यक्रमाप्रसंगी पोलिस सतत सतर्क असतात. चौफेर लक्ष ठेवताना संशयास्पद व्यक्ती, हालचाली किंवा अनपेक्षित व अवांछित गोष्टींकडे त्यांचे बारीक लक्ष असते.

याशिवाय आंदोलने, मोर्चे, मिरवणुका, सणांच्या दिवसातील गर्दी, वाहतूक कोंडी, मोठ्या प्रमाणातील सामाजिक– राजकीय किंवा धार्मिक कार्यक्रम यांच्या संदर्भात बंदोबस्त ठेवणे, सुरक्षितता तपासणी करणे, वादाचे किंवा संघर्षाचे प्रसंग निर्माण होऊ नयेत म्हणून खबरदारी घेणे अशी असंख्य कामे पोलिसांना असतात.

इतकेच नव्हे तर एखाद्या घरगुती किंवा वैयक्तिक भांडणात मध्यस्थी करून तो वाद सोडवणे, कोणत्याही अन्यायग्रस्त व्यक्तीला किंवा संकटात सापडलेल्या व्यक्तीला तात्काळ मदत आणि मार्गदर्शन पुरवणे हे सुद्धा काम पोलिस करतात.

पुर, वादळ, दुष्काळ, भूकंप, महामारी – रोगराई अशावेळी सुद्धा पोलिसांची भूमिका फार महत्वाची ठरते.

सगळे नागरिक उत्सव साजरे करत असले तरीही पोलिस मात्र आपली सुख दु:खे, अडचणी, वैयक्तिक आणि कौटुंबिक अडचणी बाजूला ठेऊन कायम जनतेच्या सेवेसाठी आणि सुरक्षिततेसाठी तत्पर असतात.

नागरिकांना निर्धास्त राहता यावे आणि शांतपणे झोपता यावे, यासाठी पोलिस मात्र अहोरात्र डोळ्यात तेल घालून काम करत असतात. त्यांच्या या कामात एक नागरिक म्हणून आपण आपली कर्तव्ये न विसरता मदत केली पाहिजे. सर्वानी मिळून हा निर्धार केला तर समाजकंटक आणि गुन्हेगारांची काय बिशाद आहे की ते दंगली करतील.

जातीय आणि धार्मिक संवेदनशील विषय, मुद्दे, घटना अत्यंत काळजीपूर्वक हाताळताना केवळ अप्रिय घटना रोखणे किंवा परिस्थिती नियंत्रणात आणून गुन्हेगारांना पकडणे इतकेच त्यांचे काम मर्यादित नसते तर, विविध जाती धर्मातील जबाबदार व्यक्ती, संघटनांचे प्रतिनिधी यांच्याशी चर्चा करून पुन्हा अशी वेळ येऊ नये याची खात्री होई पर्यंत ते स्वस्थ बसत नाहीत.